**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**बुधवार दिनांक १४ ऑक्टोबर २०२६**

**ठळक बातम्या....**

**1. राज्यात आणखी ४० तालुक्यांत दुष्काळ जाहीर; दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात दिवाळीपूर्वी ५ हजार रुपयांची अग्रिम मदत जमा होणार**

**2. रेल्वेच्या ११ लाख ४० हजार पात्र कर्मचाऱ्यांना उत्पादकता संलग्न बोनस देण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी**

**3. राज्यातील अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांना दिवाळीपूर्वी प्रत्येकी २ हजार रुपयांची भाऊबीज भेट**

**4. सत्तराव्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमीवर अनुयायांची अलोट गर्दी**

**आता सविस्तर बातम्या**

---

**अग्रीम मदत - मंत्रिमंडळ निर्णय**

राज्यात आणखी ४० तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला असून आता एकूण ३०५ तालुक्यात १२ दुष्काळी सवलती आणि उपाययोजना लागू करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. सह्याद्री अतिथीगृहात पार पडलेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी ही माहिती दिली. दुष्काळामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यात अग्रीम मदत म्हणून दिवाळीपुर्वी पाच हजार रूपयांची मदत जमा केली जाणार असून त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितल.

***(होल्ड... बाईट- मुख्यमंत्री २२ सेकंद )***

कर्ज वसुलीसाठी शेतकऱ्यांकडे तगादा लावू नये अशा सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यात शेतीसाठी साडेसात अश्वशक्तीपर्यंत वीज पुरवठा मोफत आहे. यातूनही वीज बिलासाठी कुणी तगादा लावत असेल, तर त्यांना तसे न करण्याबात सक्त सूचना देण्यात येतील असंही फडणवीस म्हणाले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शासनाचे प्रमुख म्हणून २५ वर्षं पूर्ण केल्यानिमित्त राज्य सरकारने त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मंजूर केल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. राज्यातल्या छोट्या, चिंचोळ्या आकाराच्या, पोहोचण्याचा मार्ग नसलेल्या शासकीय भूखंड वितरणाच्या धोरणात सुधारणा करायला आज राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी देण्यात आली. तसंच बुलढाणा जिल्ह्यात संत गजानन

महाराज संस्थानाला मौजे गिरडाइथल्या जमिनीवर यात्रास्थळ विकासासाठी बांधकामाला मंजुरी देण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

---

**केंद्रीय मंत्रिमंडळ निर्णय**

रेल्वेच्या ११ लाख ४० हजारांहून अधिक पात्र अराजपत्रित कर्मचाऱ्यांना ७८ दिवसांच्या वेतनाइतका उत्पादकता संलग्न बोनस देण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. यासाठी २ हजार ९ कोटी रुपयांहून अधिक निधी मंजूर करण्यात आला असून, प्रत्येक पात्र कर्मचाऱ्याला कमाल १७ हजार ९५१ रुपये बोनस मिळणार आहे. रेल्वेत सुमारे १ लाख ६५ हजार पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू असल्याची माहिती केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.केंद्रीय मंत्रिमंडळान आज राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रम २०२६-२७ ते २०३०-३१ या पाच वर्षांसाठी सुरू ठेवण्यास मंजुरी दिली आहे. यासाठी ५३ हजार ४२८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, देशातील ३६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील ३ कोटी २० लाख लाभार्थ्यांना याचा लाभ मिळणार आहे. दिव्यांग पेन्शन योजनेअंतर्गत ७९ वर्षांपर्यंतच्या लाभार्थ्यांना ३७५ रुपये, तर ८० वर्षे आणि त्यापुढील वयोगटातील लाभार्थ्यांना ६२५ रुपये सहाय्य देण्यात येणार आहे. दिव्यांगत्वाची पात्रता मर्यादा ८० टक्क्यांवरून ४० टक्के करण्यात येणार आहे. आयडीबीआय बँकेच्या धोरणात्मक पुनर्रचनेलाही केंद्रीय मंत्रिमंडळान मंजुरी दिली आहे. यासाठी धोरणात्मक भागीदाराची निवड करण्यात आली असून, पुनर्रचित बँकेत केंद्र सरकार आणि एलआयसी यांचा एकूण ३४ टक्के हिस्सा कायम राहणार आहे.

---

**भाऊबीज**

राज्यातील अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना दिवाळीपूर्वी प्रत्येकी २ हजार रुपये भाऊबीजेची भेट देण्यात येणार असल्याची माहिती महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. राज्यातील २ लाख १४ हजार ९७ अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्यासाठी ४२ कोटी ८१ लाख ९४ हजार रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. गर्भवती महिला, स्तनदा माता आणि बालकांच्या पोषणासाठी कार्यरत कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड व्हावी, हा या निर्णयामागील उद्देश असल्याचं तटकरे यांनी सांगितलं

---

**सेवा संकल्प - WAQF REFORMS, 2025**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली त्याला २५ वर्षे झाली. या काळात ते आधी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आणि

नंतर भारताचे पंतप्रधान म्हणून सलग कार्यरत आहेत. जनसेवा ते देशसेवा असा हा प्रवास सेवा आणि सुशासनाच्या मार्गावरुन विकसित भारत २०४७ च्या दिशेनं होत आहे. यानिमित्त विशेष मालिकेत आज आपण जाणून घेणार आहोत वक्फ सुधारणा, २०२५ बाबत-

***व्हॉइस कास्ट - स्वाती सोनपेठकर***

***वक्फ कायद्यातील कलम ४० नुसार, वक्फ मंडळाला स्वतःच्या निर्णयानुसार एखादी मालमत्ता वक्फची असल्याच घोषित करण्याचा अधिकार होता. याचा परिणाम मालमत्तांच्या नोंदणीत दिसून आला. २०१३ मध्ये वक्फ मालमत्तांची संख्या २ लाख ७ हजार होती, ती वाढून ८ लाख ७२ हजार झाली. यामध्ये सरकारच्या मालकीच्या ५ हजार ९७३ मालमत्तांचाही समावेश होता. २०२५ च्या वक्फ सुधारणा कायद्यानं, म्हणजेच उमेद कायद्यानं, ही तरतूद रद्द केली आहे. आता सरकारी जमिनीवर वक्फचा दावा केल्यास, जिल्हाधिकाऱ्यांपेक्षा वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्याकडून त्या दाव्याची तपासणी केली जाणार आहे. तसंच, प्रथमच अशा प्रकरणांमध्ये उच्च न्यायालयात अपील करण्याची तरतूद करण्यात आली आहे. या कायदेशीर सुधारणांसोबतच वक्फ मालमत्तांच्या नोंदींच डिजिटलायझेशनही करण्यात येत आहे. आता वक्फ मालमत्तांवरील दावे केवळ गृहीतकांवर नव्हे, तर ठोस पुराव्यांच्या आधारे तपासले जातील. इतर मालमत्तांच्या दाव्यांप्रमाणेच वक्फच्या दाव्यांनाही पुरावे सादर करावे लागतील.***

---------------------------------------------

**विजय वडेट्टीवार**

महाराष्ट्रात दुष्काळी परिस्थितीतही बँका, पतसंस्था आणि मायक्रोफायनान्स कंपन्यांकडून शेतकऱ्यांची कर्जवसुली सुरू असून, कुटुंबीयांची छायाचित्रे काढून दबाव टाकला जात असल्याचा आरोप काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. सरकारचे कर्जवसुली न करण्याचे आदेश धाब्यावर बसवले जात असल्याची टीका त्यांनी नागपुरात केली. ऊस उत्पादकांना प्रतिटन ५ हजार रुपये दर द्यावा, तसच विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक मदत करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

---------------------------------------------

**चंद्रशेखर बावनकुळे**

राज्यात दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी टँकर हा पाणीपुरवठ्याचा शेवटचा पर्याय असेल, असं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केलं आहे. बंद आणि अपूर्ण नळ पाणीपुरवठा योजना पुढील १५ दिवसांत सुरू करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. पाणीटंचाई आणि चारा नियोजनासाठी विशेष

मानक कार्यपद्धती तयार करण्यात येणार असून, चारा बँक स्थापन करण्यावर भर दिला जाणार आहे असं त्यांनी सांगितल. चारा बियाण्यांसाठी ६२ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. राज्यातील ३०५ तालुक्यांमध्ये दुष्काळ निवारणाचा तिसरा टप्पा सुरू असून, शेती नुकसान पंचनाम्यांचे ७० टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित पंचनामे ३१ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करून दुष्काळाची स्थिती स्पष्ट केली जाणार असल्याचं बावनकुळे म्हणाले.

---------------------------------------------

**धम्मचक्र प्रवर्तन दिन**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी विजयादशमीच्या मुहूर्तावर नागपूरच्या पवित्र दीक्षाभूमी इथं लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. हा दिवस धम्मचक्र प्रवर्तन दिन म्हणून साजरा केला जातो. आज, १४ ऑक्टोबर रोजी या ऐतिहासिक दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मध्यवर्ती स्मारकाला अभिवादन करण्यासाठी हजारोंच्या संख्येने अनुयायी दीक्षाभूमीवर येत आहेत.

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमी इथं येणाऱ्या अनुयायांसाठी प्रशासनान प्रथमच २३ हजार १०० जणांची क्षमता असलेले २४ निवास कक्ष उपलब्ध करून दिले आहेत. प्रत्येक निवास कक्षात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याची माहिती देणारे 'भीमसृष्टी' दालन उभारण्यात आल आहे शिवाय अन्य मूलभूत सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आल्याचं समाजकल्याण उपायुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी सांगितलं -

***(होल्ड बाईट - तेलगोटे ४३ सेकंद )***

---------------------------------------------

**अभिजित दिपके**

कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दिपके यांनी मतदार यादीतून नागरिकांची नावे वगळली जात असल्याच्या मुद्द्यावरून सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेवर नागपुरात प्रश्न उपस्थित केले आहेत. आज दीक्षाभूमी इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी नागपुरात आले असताना त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला . देशात आणीबाणीसदृश परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप करत त्यांनी लोकशाही आणि संविधानाच्या संरक्षणाची गरज व्यक्त केली. जंतर-मंतर येथे तिरंगा फडकवण्यासाठी परवानगी घ्यावी लागत असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. सौरव दास आणि आशुतोष रांका यांना बेकायदेशीरपणे कोठडीत ठेवल्याचा दावाही त्यांनी केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानानुसारच देश चालला पाहिजे, अशी भूमिका दिपके यांनी मांडली.

***(होल्ड बाईट - दीपके - २० सेकंद )***

---

## आंदोलन

थकीत देयकांसाठी येत्या १९ तारखेला आंदोलन करण्याचा निर्णय राज्यातल्या कंत्राटदारांनी घेतला आहे. सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांवर यादिवशी मोर्चे काढले जाणार आहेत. राज्य सरकारनं कंत्राटदारांची सुमारे ९६ हजार कोटीरुपयांची देणी थकवली आहेत, असा आरोप राज्य कंत्राटदार संघटनेचे अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी केला. आर्थिक तणावामुळे गेल्या १० महिन्यांत ९ कंत्राटदारांनी आत्महत्या केल्याचंही त्यांनी संगितलं.

---

## टी-२०

भारत आणि वेस्ट इंडीज यांच्यातल्या टी-२० क्रिकेट मालिकेतला चौथा सामना आज हैदराबाद इथं होणार आहे. राजीव गांधी आंतरराष्ट्रीय मैदानावर संध्याकाळी सात वाजता सामना सुरु होईल. या मालिकेत २ सामने जिंकून भारताने आघाडी घेतली आहे.

---

## चलनफुगवट्याचा दर

अन्नपदार्थ, इंधन, कारखान्यात तयार होणारा माल, आणि विजेच्या दरात वाढ झाल्यामुळे घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित चलनफुगवट्याच्या दरानं दोन आकडी टप्पा गाठला आहे. ऑगस्टमधे हा दर ९ पूर्णांक ९२ शतांश टक्के होता, तो सप्टेंबरमधे ११ पूर्णांक ३९ शतांश टक्क्यांवर पोहोचला.

---

## दुष्काळी परिस्थितीची पाहणी

अकोला जिल्ह्यातील मूर्तीजापूर तालुक्यातील कवळा इथं उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार यांनी दुष्काळी परिस्थितीची पाहणी करून शेतकरी आणि ग्रामस्थांशी संवाद साधला. रोजगार हमी योजनेअंतर्गत शेतरस्ते, कोल्हापुरी बंधाऱ्यांचे खोलीकरण, जलतारा आणि विहीर पुनर्भरणाची काम तातडीने हाती घेण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

---